पावसाचे आगमन व पेरणीसाठी सूचक आवाजात 'पेर्ते व्हा' ची शेतकऱ्यांना साद घालणारा पक्षी व त्याचे महत्त्व अधोरेखित करते. 'देव अजब गारोडी' कवितेतून मातीच्या मार्दवाची, तिच्या सृजनतेची ओळख कवयित्री पटवून देतानांच देवाला अजब गारोडी ठरवते. कापनी, रगडनी, उपननी, मोट हाकलतो एक, गाडीजोडी, गुढी उभारणी, या कविता शेती आणि शेतकऱ्याच्या समृध्दिचं प्रतीक आहेत. त्या शेती व शेतकऱ्याच्या सधनतेचे दर्शन घडवतात. शेतकऱ्याला समृध्द करणाऱ्या शेतीचं, तिच्या वैभवाचं दर्शन आपल्या कवितेतून बहिणाबाईंनी साकारले आहे, त्याबरोबरच 'गुढी उभारणी, आखजी (अक्षय तृतीया), पोया (पोळा), या कविता कृषी सणांचे शेतकरी जीवनातील महत्त्व सांगतानाच ग्रामसंस्कृतीचं दर्शन घडवतात. गोसाई, जयरामबुवाचा मान, खोकली माय, या कविता गावातील लोकजीवनाचा भाग असलेल्या माणसाचे, व लोकजीवनाचे दर्शन घडवतात.

**सारांश,**

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेची भाषा ही 'अहिराणी' भाषा असून खानदेशच्या मातीचे, तेथील निसर्ग सौंदर्याचे, लोकजीवनाचे व लोकसंस्कृतीचे व लोकभाषेचे दर्शन घडते. सर्व सामान्यांच्या मनाला भिडणारी शब्दकळा असल्यामुळे बहिणाबाईची कविता अधिकच मनाला भावते. शब्दामध्ये ओलावा आहे. आपलेपणाचे भाव आहेत. श्रमाची, कष्टाची जोड आहे. त्यामुळे त्यांना एक सुंदर सूर गवसला आहे. ती लोकगीताच्या अधिकच जवळची वाटते. मराठी भाषेला अधिकाधिक समृध्द करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

बहिणाबाई चौधरी यांची आधुनिक कविता मराठी कवितेतील एक मानाचं पान आहे. ती स्वतंत्र वळणाची असून अहिराणी भाषेतून ती सहजपणे अवतरते. शेती–भाती व शेतीसंस्कृतीशी अतिशय जवळचं नातं असल्यामुळे कष्ट करणाऱ्या बहिणाबाईचे कृषीनिष्ठ अनुभव त्यांच्या कवितेतून अतिशय तरल आणि जीवंत वाटतात. त्यांच्या कवितेची भाषा, व कविता ह्या मराठी भाषा आणि मराठी कवितेला समृध्द करतात. म्हणून त्यांची कविताच स्वतःचे महत्त्व अधोरेखित करते. ग्रामीण व कृषीनिष्ठ अनुभवांना मांडणारी कविता म्हणूनही बहिणाबाईंची कविता महत्त्वाची वाटते.

**संदर्भ:**

1) चौधरी, कै. बहिणाबाई, – बहिणाबाईची गाणी, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती 2013, पृ.–9'
2) तत्रैव, पृष्ठ – 9
3) तत्रैव, पृष्ठ – 10
4) तत्रैव, पृष्ठ – 12
5) तत्रैव, पृष्ठ – 14
6) तत्रैव, पृष्ठ – 16
7) तत्रैव, पृष्ठ – 18
8) तत्रैव, पृष्ठ – 19
9) तत्रैव, पृष्ठ – 20
10) तत्रैव, पृष्ठ – 21





# आदिम काव्यातील थोर महात्मे

प्रा. डॉ. राजेश धनजकर
श्री संत जनाबाई महाविद्यालय,
गंगाखेड जि. परभणी

-------------- (17) --------------------Dept. of Marathi ----------------------------------------

जगाच्या पाठीवर कुठलाही समाज असो. त्या समाजामध्ये जन्माला आलेले प्रत्येक संत, महापुरुष, वीर महात्मे व क्रांतिकारक आदिंना फार महत्त्वाचे स्थान असते. आणि म्हणूनच आज संबंध देशभर प्रत्येक समाज आपापल्या वीर पुरुष व थोर महात्म्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करतांना दिसतो. परंतु दऱ्याखोऱ्यातला आदिवासी समाज मात्र याला अपवाद होता. कारण की, त्याला आपल्या समाजातील वीर महात्म्यांची पुरती ओळख झालेली नव्हती. अलीकडच्या काळात याही समाजाला आपल्या वीर पुरुषांची ओळख पटायला लागली. तोही आता आपल्या महापुरुषांची जयंती धुमधडाक्यात साजरी करु लागला. आदिवासींचा महान राजा 'महात्मा रावण' वगळता इतर महापुरुष व क्रांतिकारकांची जयंती या समाजाकडून केली जात आहे. महात्मा एकलव्य, क्रांतिकारक राघोजी भांगरे, क्रांतिसूर्य बिरसा मुंडा या सारख्या काही महापुरुषांची जयंती संबंध देशभर साजरी केली जाते. लोक मोठ्या संख्येने या जयंती उत्सवाला उपस्थित राहू लागले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी माणसाने जंगलाचा रस्ता तुडवत गावगाड्यात प्रवेश केला असला, तरी अजूनही बहुतांश लोक त्याच जंगल पहाडात चाचपडताना दिसतात. परंतु जे लोक बिगर आदिवासी समाजाशी एकरुप झाले, त्यांनी त्यांच्या संस्कृतीचे (हिंदू) काही अंशी अनुकरण केले. पण तो आपल्या संस्कृतीला (आदिम) पूर्णतः विसरला नाही हे विशेष होय. सत्तरच्या दशकात आदिवासी समाजातील थोडीबहुत मुले आश्रमशाळेच्या माध्यमातून शिक्षणाकडे वळू लागली आणि खऱ्या अर्थाने इथूनच या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटू लागले. संबंध देशभर आश्रम शाळेची दारे खुली झाली. शिक्षण घेऊन पुढे आलेली एकेक पिढी स्वहिताबरोबरच समाजाच्या हिताचे चिंतन करु लागली. तर त्यातील काही सुज्ञ मंडळी वाचन व लेखनाकडे वळाल्याची दिसते. 'आत्मकथन', 'कविता', 'कथा' आदी वाङमय प्रकार तो आपापल्या परीने हाताळू लागला. समाजाच्या व्यथा-वेदना, दुःख, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, प्रथा व परंपरा यासारखे काही विषय तो आपल्या साहित्यातून मांडू लागला.

याचवेळी आदिवासी कवींनी आपला मोर्चा आदिवासी समाजातील महापुरुष व क्रांतिकारकांच्या कार्य आणि कर्तृत्वाकडे वळविला. महात्मा रावण, धनुर्धारी एकलव्य, क्रांतिकारक राघोजी भांगरे, बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल, बाबुराव शेडमाके यांचा इतिहास कवितेच्या माध्यमातून उजेडात आणला. परंतु मी मात्र प्रस्तुत शोध निबंधात रामायणातील 'रावण' व महाभारतातील 'एकलव्य' या दोन थोर महात्म्यांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवसी समाजातील जेष्ठ कवी सीताराम कांबळे 'रावणा' ची खरी ओळख करुन देतांना म्हणतात की,

"रावण होता राजा आदिवासी समाजाचा
आणि गोंड जमातीचा
रावण होता महान
म्हणून सीता सुरक्षित राहिली
शत्रुची बायको असून
नीती नाही फिरली
बहिणीची अवस्था पाहून
मर्द त्यातला जागा झाला
सीतेला उचलून नेऊन
त्याने कोणता गुन्हा केला

महात्मा 'रावण' हा आदिवासी समाजातील थोर विद्वान व प्रतिभासंपन्न राजा होता. सीतेसारखी शत्रुची बायको पळवून नेऊन त्याने स्वतःच्या राजमहालात ठेवण्याऐवजी तिला अशोक वनात ठेवले. रावणाने सीतेचे शील व चारित्र्य या ठिकाणी

अबाधित ठेवले. आपली नीतिमत्ता यत्किंचितही ढळू दिली नाही. परंतु रावणाची बहीण शुर्पणखाची झालेली विटंबना पाहून रावणाचा राग अनावर झाला. रावण चवताळला व त्याने सीतेचे हरण केले. यात रावणाचा मुळीच दोष नाही.

"भावाचं कर्तव्ये त्याने पार पाडलं
भट बामणांनी त्याला
वेगळचं वळण लावलं
बिभिषणाने घात केला
म्हणून रावण हारला
कळलं नाही रावणाला
कधी त्याचा घात झाला
रावणाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा
आपल्या कर्तव्याला जागा
रामायणातील रावणाला
डोक्यापुढे ठेवून बघा" १

बहिणाचे रक्षण भावाने नाही करायचे, तर मग कुणी करायचे ? रावणाने या ठिकाणी आपले कर्तव्ये पार पाडले. पण या वैदिक ब्राह्मणांनी या घटनेला वेगळेच वळण लावले आणि खापर मात्र रावणाच्या माथ्यावर फोडले. खरे तर, राम-रावण युद्धात बिभिषणाने रावणाला मदत करण्याऐवजी वैऱ्याला मदत केली. इथेच रावणाचा घात झाला. तरीही रावणासारख्या कर्तव्यदक्ष राजाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवण्याचा सल्ला कवी देतो.

"वाल्मिकींनी रामायणात रावणाची प्रशंसा महान विद्वान, वेदशास्त्र जाणकार, वीर योद्धा, वीर शिपाई, परमात्म्याचा प्रिय पुत्र, महान संत, कर्तव्यदक्ष राजा, पालनकर्ता, शक्तीशाली व वरदानी पुरुष अशा शब्दात केली आहे. "२

रावणाचे व्यक्तिमत्त्वच मुळात सर्वगुण संपन्न होते. परंतु येथील वर्णव्यवस्थेने त्याच्या गुणांची कदर कधी केलीच नाही. उलट त्याची प्रतिमा जेवढी मलीन करता येईल, तेवढी केली. समाजासमोर त्याला खलनायकाच्या भूमिकेत उभे केले. नको तेवढे तोंड बसवून त्याचे हिडीस व विकृत रुप समाजात पसरविण्याचे काम येथील वैदिकाने केले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर दरवर्षी दसऱ्याला रावण दहण करण्याची 'कू' प्रथाही त्यांनीच रुढ केली. या ठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो की, रावणाला खरेच दहा तोंडे होती का ? आणि जर ती असतील, तर त्याला जन्म देणाऱ्या मातेकडे आम्ही कोणत्या नजरेने पाहणार आहोत आणि पहायचे झाल्यास आम्हाला आमची 'सद्सद्विवेक बुद्धी' गहाण ठेवूनच पहावे लागेल. मुळात त्या काळी 'सिझर' ची सोय असती, तर कदाचित 'रावण दहा तोंडा' चा होता हे आम्ही मान्य केले असते. पण तशी काही व्यवस्था त्या काळात उपलब्ध नव्हती, हे प्रथम आम्ही समजून घेतले पाहिजे. "रावण इतका प्रतिभावंत होता की, तो एकाच वेळेस दहा व्यक्तिंशी दहा विषयावर बोलतअसे व दहा व्यक्तिंशी एकाच वेळेस वादविवादही करु शकत असे. म्हणजे रावण हा दहा वैदिक ब्राह्मणांना भारी होता. श्रेष्ठ होता. यामुळेच रावणाला वैदिकांनी दहा तोंडाचा बनवले"३

डॉ. मधुसूदन चान्सरकर या जागतिक किर्तीच्या अर्थतज्ज्ञाने श्रीलंकेतील वास्तव्यात असतांना 'रावणा' वर संशोधन केले. ते म्हणतात, "रावण हा अनेक विज्ञानाचा कर्ता आहे. रावणाने ५ हजार वर्षापूर्वी तंतुवाद्याचे संशोधन करुन याळ (पवा) नावाची वीणा बनवली तीच 'रावणवीणा' वा 'रुद्रवीणा' म्हणून वाद्यात मानाचे स्थान मिळवून बसली. संगीताचा व नादमाधुर्याचा सुंदर मिलाफ साधणारी 'रावणवीणा' ऊर्फ 'याळ' ऊर्फ 'रुद्रवीणा' ही रावणाची हिंदूस्थानी संगीताला मिळालेली देणगी आहे. ज्या वाल्मिकीने रावणाला महाकाव्यातला खलनायक ठरविले. तोच रावण एक वैज्ञानिक, गायक, वीणावादक, अंतराळ संशोधक, नगररचना संशोधक, सौरशक्ती संशोधक, निर्यातदार सम्राट म्हणून वाल्मिकीला परिचित होता. " ४

यावरुन हेच सिद्ध होते की, रामायणातील रावण हा सर्वगुण संपन्न राजा होता. प्रजेच्या हिताची काळजी वाहणारा दक्ष राजा होता. परंतु रामाचे अंधभक्त मात्र अजूनही रावणाच्या सत्याकडे डोळेझाकच करतांना दिसतात. वरुन रावण हा अहंकारी पुरुष, भोगविलासी, अनीतिमान, अधार्मिक, असंस्कृत, चारित्र्यहीन व संपत्तीचा माज चढलेला राक्षसी पुरुष म्हणूनच त्याची अवहेलना करतात. असे करणे हे मुळात त्यांच्या अज्ञानीपणाचे लक्षण आहे.





आज आदिवासी माणूस जागा होतो आहे. आपल्या समाजात होऊन गेलेले थोर महात्मे व वीर पुरुष आदिंचा तो इतिहास धुंडाळतांना दिसतो. इतिहासाकडे तो चिकित्सेच्या नजरेने पाहू लागला. यातूनच त्याला आपल्या महापुरुषांची ओळख पटू लागली. त्यांच्यातला आत्मसन्मान व स्वाभिमान जागा झाला आणि म्हणूनच आज तो मिरवणुकीच्या माध्यमातून त्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करतांना दिसतो. "मध्यप्रदेश आणि दक्षिणेत आजही रावणाचे दहन केले जात नाही, उलट रावणाची मंदिरे असून, काही आदिवासी जमातीकडून रावणाचे पूजन केले जाते. 'रक्षेंद्र' या कादंबरीचे लेखक नाना ढाकूलकर यांनी असे निरीक्षण नोंदविले आहे की, रायपूर जिल्ह्यात रावणभाया खेड्यात महादेवाच्या मंदिरासमोर रावणाची भव्य दगडी मूर्ती आहे. तेथील आदिवासी स्त्री पुरुष महादेवाची पूजा करुन रावणाभोवती फेर धरुन धुंद होऊन नाचतात, रावणाचे स्तुतीगान करतात. ते स्वतःला रावणाचे वंशज व प्रजा समजतात"५. मुळातच रावण हा शिवाचा भक्त असल्यामुळे त्याने वैदिकांच्या यज्ञपूजेतील प्राणी हत्या बंद केली. कारण रावण हा अहिंसेचा पुरस्कर्ता होता आणि म्हणूनच आज संबंध देशातील आदिवासी समाज शिवपूजेप्रसंगी कुठल्याही प्राण्यांची हत्या करतांना दिसत नाही.

रामायणामध्ये 'रावणा' सारख्या थोर महात्म्यांचा जसा उल्लेख येतो, अगदी तसाच महात्मा 'एकलव्य' देखील महाभारतात सापडतो. मुळात 'रावण' व 'एकलव्य' ही दोनही व्यक्तिमत्त्वे आदिवासींचे आदर्श आहेत. त्यांचे कर्तृत्वही फार मोठे आहे. पण त्या काळच्या इतिहासाने त्यांची नोंद घेतली नाही. परंतु अलीकडे आदिवासी कवींनी आपल्या काव्यातून या थोर महत्म्यांची ओळख जगाला व समाजाला करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. "महाभारतातील एकलव्याची कथा सुरुवातीलाच आली असून ती आदिवासी समाजाच्या दुःख व वेदनेवर चांगलेच मीठ चोळते. ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी व वैदिक धर्म प्रसारासाठी विद्याबंदी घातल्याचा पुरावा महाभारतातच मिळतो. ही विद्याबंदी फक्त शूद्र व अतिशूद्रांनाच होती असे नाही, तर ती आदिवासींनाही लागू होती. म्हणजेच शूद्र व अतिशूद्रापेक्षा आदिवासींची किंमत फार काही जास्त नव्हती"६. आदिवासी समाज वर्णाश्रमाच्या चौकटीत बसत नसला, तरी या वर्णव्यवस्थेने आदिम माणसाचे माणूसपण मात्र हिरावून घेतले होते. एकलव्यदेखील या गढूळ व्यवस्थेला बळी पडला होता.

"गुरदक्षिणेचे निष्ठाशास्त्र जाळावेसे वाटले असेल वनपुत्रा !
तेंव्हा वेदनांचा वणवा झाला असशील तू
अरे वर्णवादी आयुष्याने नाकारलेले गुरुत्व
शब्दबद्ध झाले होते
प्रस्थापित आयुष्याच्या वीरतेशी
मान्य नाही इथल्या दीर्घजीवी वर्णशाहीला
तू श्रेष्ठतम धनुर्धर म्हणून "

एकलव्याचे श्रेष्ठत्वच मुळात येथील वर्ण व्यवस्थेला मान्य नाही. आदिवासींच्या पोटी जन्मलेला एकलव्य धनुर्विद्येत अर्जुनाला वरचढ ठरतो हे व्यवस्थेविरोधी कृत्य गुरुला पटत नाही. एकलव्याची वीरता गुरुच्या डोळ्यात काट्यासारखी सलते. त्यामुळेच गुरु एकलव्याच्या अंगठ्याची मागणी गुरुदक्षिणा म्हणून करतो. अशा या कपट कारस्थाने रचणाऱ्या गुरु व व्यवस्थेला कायमचे झिडकारले पाहिजे, असे कवीला वाटते. जुलूम व जबरदस्ती करणारी अन्यायी व्यवस्था उद्ध्वस्त केली पाहिजे अन्यथा भविष्यात हजारो एकलव्याची बोटेच काय हातदेखील छाटण्यास ही व्यवस्था कमी करणार नाही.

"मित्रवरा ! तुझ्या भात्यातील तळपणाऱ्या तीक्ष्ण तीरांना
करणार आहे मी क्रांतीच्या मशाली अन्
तुझ्या अंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने
लिहिणार आहे मी इथल्या सुवर्णशाहीचा मृत्यूलेख
कारण वेदनांनी भरलेले
तुझे वनवासी जीवन
मीही वर्णबळी म्हणून जगतो"७

एकलव्याशी कवी या ठिकाणी मित्रत्त्वाचे नाते जोडतांना म्हणतो की, मित्रा, मी आता क्रांतिसाठी सज्ज झालो आहे. तुझ या भात्यातल्या तीक्ष्ण तीरांचा वापर मी क्रांतिसाठी करणार आहे. त्यांच्या मशाली करुन येथील वर्णव्यवस्थेला भस्मसात करण्यास

कवी उतावीळ झाला आहे. ज्या वर्णव्यवस्थेने तुझा अंगठा कलम केला, त्याच व्यवस्थेचा मृत्यूलेख भळंभळं सांडलेल्या रक्ताने लिहिणार आहे. कारण तू जे वंदनादायी व दुःखद वनवासी जीवन जगलास, तेच जीवन मीही जगत आहे, अशी कबुली कवी देतात.

सुनील कुमरे हे एक आदिवासी साहित्य जगतातील एक सर्जनशील व प्रतिभावंत कवी आहेत. 'तीरकमठा' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह १९९९ साली प्रकाशित झाला. तीरकमठा म्हणजे आदिवासी एकलव्याचे धनुर्धारी व प्रहारी आयुध.

"मस्जिद उद्ध्वस्त करुन धर्मांध संघ म्हणाले,
हिंदूची अस्मिता आम्ही जागृत केली
जय श्रीराम !
आपण असे लंगोटी - चिरगूट कुठपर्यंत सांभाळायचे
भेदला पाहिजे तिरकमठ्यांनी आजवरचा काळोख
जय उलगुलान !

६ डिसेंबर १९९२ ला या देशातील वैदिक ब्राह्मणांनी बाबरी मशीद पाडून आपल्या मनुवादी वृत्तीचा जयजयकार केला. राममंदिर उभारणीच्या नावाखाली ब्राम्हणांनी बाबरी मशीद उद्ध्वस्त केली. याच घटनेने कवी अस्वस्थ होतो. हिंदूची अस्मिता जागृत होत असतांना आदिवासींच्या काळोखमय जीवनाचे काय ? हा कवीला पडलेला मूलभूत प्रश्न आहे. म्हणून कवी म्हणतात की, येथील प्रस्थापित व्यवस्थेने राम मंदिर उभारणीचा आग्रह धरण्यापेक्षा, आदिमांचे दुःख व दारिद्रय हटवण्याचा आग्रह धरला पाहिजे. पण तसले प्रयत्न त्यांच्याकडून झाले, तर ते कसले आले वैदिक ब्राम्हण

"ही तर हिंदूमधील वनवासी संस्कृती
एकलव्य अंगठ्याच्या थारोळ्यात
उपेक्षितपणे अवाक्‌च राहिला" ८

आदिमांच्या आयुष्यातील काळोख तिरकमठ्यांनी भेदण्याचे आवाहन कवी करतो. कारण हेच संघवाले येथील मूळनिवासी आदिमांचे वनवासीकरण करण्याचा घाट घालत आहेत. या संदर्भात डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात, "आदिवासींच्या वनवासीकरणात एकलव्य हा अंगठ्याच्या थारोळ्यात आश्चर्यचकीत नजरेने उभा आहे"९

उषाकिरण आत्राम हया एक आदिवासी साहित्यक्षेत्रातील आघाडीच्या कवयित्री कथा, कविता व बालगीतसंग्रह या वाङ्मय प्रकारात त्यांचे विपुल लेखन. जंगल पहाडात यातनामय जीवन जगणारा आदिम समाज हा त्यांच्या लेखनीचा केंद्रबिंदू.

"तुम्ही असे कसे ? दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिता
त्याच ओंजळी एकलव्याच्या अंगठ्याचे रक्त पितात
कुणाच्या तंत्रमंत्र उपदेशवाणीवर भाळू नका
आपणच आपले जगणे- मरणे ठरवा !
आपणच आपला अत् दीप व्हा ! "१०

आदिम समाजाला सावध करताना कवयित्री म्हणतात की, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिने बंद करा असे करणे हे धोकादायक आहे आणि आपण तो धोका एकवेळ पत्करलेला आहे. कारण त्याच ओंजळीच्या हाताने आपल्या भविष्याचा विश्वासघात केला आहे. एकलव्याचा अंगठा कापणारा तोच हात होता. तुम्ही तर त्याच हातावर विश्वास ठेवत आहात, ही फार मोठी धोक्याची घंटा आहे. अशा या कपट कारस्थानी व अविश्वासू माणसांच्या कोणत्याच कृतींवर विश्वास ठेवू नका. तंत्रमंत्र व उपदेशवाणी आदिंवरही भाळून जाऊ नका. आपले जगणे व मरणे इतरांनी ठरवण्यापेक्षा आपणच ठरवले पाहिजेत. आपणच आपल्या प्रकाशाचे दीप व शिल्पकार व्हावे, असे कवयित्रीला मनोमन वाटते.

"एकलव्यासारखा
अंगठा कापून देणार नाही
न शिकविणाऱ्याला
गुरुही माणणार नाही
जे सत्य आहे





तेच सांगू
आणि उभे राहू लढ्याला
माणूस म्हणून ............. "१२

कवयित्री या ठिकाणी लढण्याची प्रेरणा देताना म्हणते की, एकलव्याच्या बाबतीत जे झाले, त्याची पुनरावृत्ती आता होऊ देणार नाही. खऱ्या गुरुची महती आम्ही जरुर गाऊ. कारण तो आदिमांचा धर्म आहे. पण द्रोणाचार्यासारख्या कपटी वैदिकाला आम्ही गुरु माणणार नाही. या वैदिक ब्राह्मणांचे व त्यांच्या स्वार्थी व मतलबी गुरुंचे डाव आता आम्ही ओळखले आहेत. त्यांच्या खोटारडेपणाचा आता भांडाफोड झाला आहे. जे खरं असेल तेच आम्ही जगाला ओरडून सांगू आणि हे सांगण्यासाठी व लढण्यासाठी आम्हाला पहाडासारखे उभे रहावे लागेल.

--------------------**संदर्भ :**------------------------------

१. कांबळे सीताराम (अप्रकाशित कविता)
२. दीपक गायकवाड 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा' सुगावा प्रकाशन, पुणे पृ. ३५.
३. तत्रैव, पृ.४३
४. धुक्यात हरवलेले ज्ञानभांडार - अरुण निगुडकर, दैनिक सामना दि. १३ मार्च २००८, पृ.४
५. डॉ. वैजनाथ अनमुलवाड 'आदिवासी समाज, संस्कृती आणि साहित्य' इसाप प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती १५ नोंव्हे. २०१२, पृ.७६
६. दीपक गायकवाड 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा' सुगावा प्रकाशन, पुणे पृ. ४४.
७. डॉ. विनायक तुमराम 'गोंडवन पेटले आहे' एकलव्य प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती १९८७.
८. सुनील कुमरे 'तिरकमठा' हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर -१९९९.
९. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर 'आदिवासी साहित्य : एक अभ्यास' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००९, पृ.२११.
१०. डॉ. तुकाराम रोंगटे, 'आदिवासी कवितेचा उषःकाल आणि सद्यस्थिती' संस्कृती प्रकाशन, पुणे -२००७, पृ. ३९ (उषाकिरण आत्राम यांची कविता)
११. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर 'आदिवासी साहित्य : एक अभ्यास' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००९. (गोविंद कन्नाके यांची कविता)
१२. कविता आत्राम 'काजवा' कविता प्रकाशन, धुळे प्रथमावृत्ती -२०११, पृ. २.